दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ९० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.२४ जून २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## रायगडवर शिवराज्याभिषेक दिमाखात साजरा

# २०२३ मध्ये ३५० वा शिवराज्याभिषेक भव्यदिव्य असेल : आ. भरत गोगावले

**दै.रायगड नगरी । महाड**

**किल्ले रायगडवर आज तिथीनुसार ३५० वा शिवराज्याभिषेक दिन उत्साहात आणि दिमाखात साजरा करण्यात आला. २०२३ मध्ये ३५० वा शिवराज्याभिषेक दिन असेल. तारखेनुसार तो २ जून रोजी येत आहे. तो सोहोळा लाखो शिव भक्तांच्या उपस्थितीत भव्य दिव्य प्रमाणात साजरा करण्यात येईल असे महाडचे आमदार भरत गोगावले यांनी यावेळेस बोलताना जाहीर केले.**



आज २४८ वा शिवराज्याभिषेक दिन श्री शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समिती, कोकण कडा मित्र मंडळ आणि रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने साजरा करण्यात आला. कोरोना प्रादूर्भावाच्या पार्श्वभूमीवर मर्यादित लोकांनाच गडावर जाण्यास परवानगी देण्यात आली असली तरी गडावर उत्साहाची मात्र कमी नव्हती.

प्रारंभी ध्वजारोहण आणि त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेवर विधिवत अभिषेक करण्यात आला. महाडच्या सभापती सौ.सपना मालुसरे आणि त्यांच्या पतीला पुजेचा मान देण्यात आला होता. प्रकाशस्वामी जंगम यांनी पौरोहित्य केले. या सोहोळ्याला आ. भरत गोगावले, उरणचे माजी आमदार मनोहर भोईर, सभापती सपना मालुसरे, जिल्हा परिषद सदस्य मनोज काळीजकर संजय कचरे, युवा सेना जिल्हाधिकारी विकास गोगावले, सिध्देश पाटेकर, पांडूरंग बलकावडे, साताऱ्याचे माजी उपनगराध्यक्ष सुहास राजेशिर्के, खा. श्रीकांत शिंदेचे सचिव मंगेश चिवटे यांच्यासह दिनोत्सव समितीचे अध्यक्ष सुमित पवार, कार्याध्यक्ष सनी ताटेले, समीर वाईकर, रंजन गावडे, संजय ढमाल, हमीदा खान, अली महमंद, सुनील कदम तर कोकणकडा मित्रमंडळाचे अध्यक्ष संकेत वडके, कार्याध्यक्ष नितीन पवाले, रोहित पवार, हर्षल नाईक, सिध्देश सुर्वे, सिध्देश मोरे आदि उपस्थित होते.

या सोहळ्यासाठी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी पाच लाख रुपयांचा निधी श्री शिवराज्याभिषेक दिनोत्सव समितीला दिल्याची माहिती समितीचे अध्यक्ष सुमित पवार यांनी दिली. राज्याभिषेकाच्या विधीनंतर राजसदर ते जगदिश्वर मंदिरापर्यंत शिवपालखीची मिरवणूक काढण्यात आली. आज तिथी नुसार साजऱ्या होणाऱ्या शिव राज्याभिषेक दिनासाठी शेकडो शिवभक्त रायगडवर जाण्यासाठी आले होते. मात्र पोलिसांनी ठिकठिकाणी त्यांना रोखून ठेवले.

# दि.बा.साहेबांच्या नावासाठी गुरुवारी सिडकोला 'भूतो न भविष्यतो' घेराव

## किमान ०१ लाख लोकांचा असणार सहभाग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिलेच पाहिजे, यासाठी गुरुवार दिनांक २४ जूनला सिडकोवर किमान ०१ लाख लोकांचा घेराव होणार आहे. त्या अनुषंगाने सकाळी १०. ३० वाजता आंदोलक सिडकोला धडक देणार आहेत.



विमानतळ नामकरणासंदर्भात लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती आणि राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यामध्ये बैठका झाल्या होत्या. मात्र मुख्यमंत्र्यांच्या हट्टामुळे नामकरणासंदर्भातील दुसऱ्या फेरीची चर्चाही फिसकटली. त्यामुळे लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावालामुख्यमंत्र्यांचा विरोध असल्याचे स्पष्ट असून त्यांनी घेतलेली हि भूमिका प्रकल्पग्रस्त, भूमिपुत्र आणि प्रकल्पग्रस्त गावांवर अन्यायकारी असल्याने मुख्यमंत्र्यांच्या या हेकेगिरी भूमिकेचा सर्व स्तरातून प्रखर विरोध करण्यात आला आहे.

प्रकल्पग्रस्तांचे लोकनेते स्व. दि. बा. पाटील यांचेच नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यासाठी घोषित करण्यात आलेले २४ जून रोजीचे सिडको घेराव आंदोलन शांततेच्या मार्गाने असले तरी आंदोलन दडपण्यासाठी पोलीस प्रशासन अँक्शन मोडवर असेल तर आम्ही रिअँक्शन मोडवर असणार आहोत, असा सणसणीत ईशारा आंदोलकांनी शासनाला दिला आहे. पोलिस ज्या ज्या ठिकाणी अडवतील त्या–त्या ठिकाणीही आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. १० जूनला झालेल्या भव्य आणि आदर्श अशा मानवी साख–ळीने संपूर्ण राज्यासह देशाचे लक्ष वेधण्याबरोबरच वाहवा मिळवली. 'निर्धार पक्का दिबासाहेबांचेच नाव पक्का' हि प्रामाणिक भूमिका घेत २४ जूनच्या आंदोलन होणार आहे. या आंदोलनात लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती सोबत विविध पक्ष, विविध संस्था, संघटना, भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त, नागरिक, तरुण, महिला, ज्येष्ठ नागरिक सहभागी होणार आहेत.

भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांचे दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनी २४ जूनला सिडकोला घेराव घालण्यात येणार आहे. ज्येष्ठ आणि तरुणाची फौज या आंदोलनात महत्वाची भूमिका पार पाडत असताना महिलाही मागे राहिल्या नाहीत. २४ जूनला योगायोगाने याच दिवशी वटपौर्णिमा आहे. असे असले तरी भूमिपुत्र सावित्रींनी यंदाची वटपौर्णिमा या आंदोलनात साजरी करणार आहेत.

# पांडवकड्याच्या धबधब्यात बुडून तरुणाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील पांडवकड्याच्या धबधब्याच्या डोहात बुडून एका १८ वर्षीय तरूणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

पांडवकडा येथे मानखुर्द गोवंडी येथील शालेय मित्र गौरव लोखंडे, अखीप खान, सुरज यादव, मौसम घरती, राहील खान असे आले होते. त्यात गौरव लोखंडे व राहिल खान तसेच मौसम घरती यांनी डोहामध्ये उड्या मारल्या त्यात गौरव व राहील असे वर येऊन मौसम घरती हा वर आला नाही तेव्हा त्यांनी नवी मुंबई कंट्रोलला कळविले. फायर ब्रिगेड व खारघर पोलिस यांनी पाण्यात गळ टाकून तसेच प्रत्यक्ष शस्वीमरपाठवून त्याचा शोध घेतला परंतु रात्री मृतदेह मिळून आला नाही. आज सकाळी ९:३० वाजेच्या सुमारास फायर ब्रिगेड कर्मचाऱ्यांनी सदर डोहातील खडका खाली अडकलेले प्रेत बाहेर काढले.

## संक्षिप्त...

### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कंपनीच्या मालकी हक्कात बदल करण्यास मान्यता

**दै.रायगड नगरी । मुंबई**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या बांधकामातील सवल–तधारक कंपनीच्या मालकी हक्कात बदल करण्याच्या प्रस्तावास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते. या विमानतळाचा पहिला टप्पा २०२३–२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. या प्रकल्पासाठी सिडको नोडल एजन्सी म्हणून काम करत आहेत.

या विमानतळाच्या बांधकामासाठी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा. लि. यांची सवलतधारक म्हणून निवड करण्यात आलेली आहे. या कंपनीच्या मालकी हक्कामध्ये नुकताच बदल झाला असून यापूर्वी या कंपनीमध्ये ५०.५ टक्के सहभाग असणाऱ्या जीव्हीके एअरपोर्ट डेव्हलपर लि. या कंपनीचे समभाग अदानी एअरपोर्ट होल्डिंग लि. यांनी घेतलेले आहेत. या बदलास केंद्र शासनाच्या नागरी विमान संचालनालय, विमानतळ प्राधिकरण, सेबी, कॉम्पिटीशन कमिशन ऑफ इंडिया यांच्या मान्यता प्राप्त झाल्या आहेत. तसेच सिडको संचालक मंडळाने देखील मालकी हक्काच्या बदलास मान्यता देण्याचा ठराव केलेला आहे. याबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प नियंत्रण व अंमलबजावणी समितीने निर्दे शित केल्याप्रमाणे या मालकी हक्कात बदल करण्यास आज बैठकीत मान्यता देण्यात आली.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.**

**संपर्क : ९८२०३५५३४६**

**ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे**

**पवन अपार्टमेंट येथील लोखंडीपाडा, नवीन जिल्हा सत्र न्यायालयासमोरील जागा बँकेच्या ए.टी.एम.साठी जागा भाड्याने देणे आहे.**

**संपर्क : ९२२३३४५२४९**

# पनवेल तालुक्यात संजय गांधी योजनेचा ४ हजार ८५४ लाभार्थ्यांना लाभ : तहसिलदार विजय तळेकर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना गोरगरीब तसेच निराधार लोकांसाठी कार्यरत असून गरजूंना आर्थिक मदतीसाठी संजय गांधी योजना कार्यान्वित आहे. पनवेल महसूल विभागातील संजय गांधी शाख–तून विविध योजनांतर्गत पनवेल तालुक्यात आतापर्यंत ४ हजार ८५४ लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ मिळत आहे तर नव्याने मंजूर झालेल्या ११३ लाभार्थ्यांनाही संजय गांधी योजनेचा लाभ मिळणार आहे, अशी माहिती तहसिलदार विजय तळेकर यांनी दिली आहे.

संजय गांधी निराधार योजनेमध्ये दारिद्र्य रेषे–खालील कुटुंबाच्या यादीत नाव असणे अथवा रुपये २१ हजार पर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणे आवश्यक आहे. या योजनेसाठी पात्र होणाऱ्या कुटुंबात एक लाभार्थी असल्यास ६०० रु. प्रति माह तर एका कुटुंबात एकापेक्षा जास्त लाभार्थी असणाऱ्यांना रुपये ९०० प्रति माह आर्थिक सहाय्य देण्यात येते. तसेच श्रावण बाळ योजना ही ६५ व ६५ वर्षावरील व दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव समाविष्ट असणाऱ्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना गट (अ) मधून रु.४०० प्रति महिना निवृत्तीवेतन देण्यात येते. याच लाभार्थीला केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजनेचे रु.२०० प्रति माह लाभार्थी निवृत्ती वेतन दिले जाते.



संजय गांधी निराधार योजनेंतर्गत ६५ खाली निराधार पुरुष व महिला अनाथ मुले, अपंगातील सर्व प्रवर्ग, क्षयरोग कर्करोग, एडस, कुष्ठरोग या सारख्या आजारामुळे स्वत:चा चरितार्थ चालवू न शकणारे पुरुष व महिला निराधार विधवा, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा, घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळालेल्या अत्याचारित व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला तृतीयपंथी, देवदासी, ३५ वर्षावरील अविवाहित स्त्री, तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची पत्नी यांना या योजनेतून लाभ मिळतो.

एकूण नवीन पात्र लाभार्थी ११३ असून त्यांना देण्यात येणारी एकूण रक्कम १ लाख ४१ हजार ४०० आहे. पात्र लाभार्थीना केंद्र शासनाकडून रु.२००, प्रतिमहा व राज्य शासनाकडून संजय गांधी निराधार अनुदान योजनेंर्तगत रु.४०० असे प्रतिमहा रु. ६०० मिळतात.

या योजनेंतर्गत ज्या व्यक्तीचे वय ६५ व ६५ वर्षावरील आहे व ज्या कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न रुपये २१ हजारच्या आत आहे. अशा वृद्धांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेत रु ६०० प्रति महिना निवृत्ती वेतन देण्यात येते. श्रावणबाळ योजनेसारखीच वृद्धांसाठी इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती योजना असून यामध्ये ग्रामीण भागासाठी सन २००२ दारिद्र्य रेषेखालील सर्वेक्षणानुसार व शहरी भागासाठी नगर विकास विभागाने दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या केलेल्या सर्वेक्षणानुसार फक्त दारिद्र्य रेषेखालील ६५ व ६५ वर्षांवरील सर्व व्यक्ती पात्र होवू शकतात.

या लाभार्थीना केंद्र शासनाकडून प्रति माह २०० रुपये प्रति लाभार्थी निवृत्तीवेतन देण्यात येते. राज्य शासनाच्या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेंतर्गत प्रति माह ४०० रुपये मिळत असल्याने राज्य आणि केंद्र सरकार मिळून प्रति माह ६०० रुपये निवृत्तीवेतन मिळते. इंदिरा गांधी .../२

# हत्येनंतर मृतदेह फेकला शेलु गावाजवळील नाल्यात ; तिघे अटकेत

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कल्याण–कर्जत राज्यमार्गावरील शेलू गावाजवळील रस्त्यालगत अज्ञात व्यक्तीचा मृतदेह सापडला होता. या घटनेचा उलगडा करण्यात नेरळ पोलिसांना यश आले आहे. सदर मृतदेह डोंबिवली येथील विवाहित तरु–णाचा असून त्याच्या पत्नीने अनैतिक संबंधातून प्रियकर व त्याच्या मित्राच्या मदतीने त्याचा खून केल्याचे समोर आले आहे. या तिघांना पोलिसांनी अटक केली आहे.

२० जून रोजी नेरळ पोलिसांना कल्याण–कर्जत राज्यमार्ग रस्त्यावरील शेलू गावाच्या प्रवेशद्वाराजवळ अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आला होता. नेरळ पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन तपासाला सुरुवात केली. तपासादरम्यान डोंबिवली येथील एक तरुण बेपत्ता असल्याची तक्रार मानपाडा पोलीस ठाण्यात दाखल असल्याची माहिती नेरळ पोलिसांना मिळाली.

प्रविण धनराज पाटील ही व्यक्ती हरवल्याची तक्रार त्याच्या नातेवाईकांनी नोंदवली असल्याने या घटनेचा तपास कल्याण गुन्हे शाखेचे पथक करीत होते. नेरळ पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक गिरीश भालचिम यांनी कल्याण गुन्हे शाखेशी संपर्क साधून नेरळ येथे सापडलेल्या मृतदेहाबाबत माहिती दिली.

हरवलेली व्यक्ती व शेलू येथे सापडलेला मृतदेह यांच्यात साम्य असल्याचे .../२

# एसटीच्या डिझेलच्या निधीत दीड कोटींचा घोळ

## रायगडातील एसटीचा चक्काजाम होण्याची भीती

**दै.रायगड नगरी । पेण**

एसटीच्या रायगड विभागीय कार्यालयांमध्ये डिझेल करिता ठेवलेले दीड कोटी रुपये आदेश नसतानाही शेकडो कर्मचाऱ्यांच्या पगाराकरीता वापरल्याची धक्कादायक घटना पेण येथे घडली आहे.




याबाबत सविस्तर माहिती अशी की, एसटीचे रायगड विभागीय कार्यालय पेण येथे असून या कार्यालयातील अकाउंट डिपार्टमेंटने एसटीला रोज लागणाऱ्या डिझेल करिता ठेवलेले सुमारे दीड कोटी रुपये कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय आदेश नसताना शेकडो कामगारांच्या पगारासाठी वापरून घोळ घातला आहे. आपली झालेली चूक लक्षात येताच लेखा विभागातील कर्मचारी वरिष्ठ अधिकाऱ्यांची एकच धावपळ झाली. एसटीच्या विभागीय नियंत्रक अनघा बारटक्के यांनी संबंधित बँकांशी संपर्क साधून सदरची रक्कम रोखण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नात त्या काही अंशी यशस्वीही ठरल्या. परंतु दरम्यान अनेक एसटी कर्मचाऱ्यांनी सदरचे पैसे पगाराचे असल्याचे समजून काढले होते.

एसटीला लागणारे डिझेलकरिता ठेवलेला निधी कर्मचाऱ्यांच्या .../२

# न्हावाशेवा-शिवडी सागरी पूल सप्टेंबर २३ मध्ये पूर्णत्वास : एमएमआरडीए

**दै.रायगड नगरी । उरण**

दक्षिण मुंबई आणि नवी मुंबई यांना जोडणार्या १८ हजार रुपये खर्चाच्या महत्त्वाकांक्षी अशा न्हावाशेवा – शिवडी पारबंदर प्रकल्पाचे (एमटीएचएल) ३५–४० टक्के काम पूर्ण झाले असून, सप्टेंबर २०२३ मध्ये हा प्रकल्प पूर्ण होईल अशी ग्वाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना दिली आहे.



मुंबई शहरासह महानगर परिसराच्या दळणवळणासाठी महत्वपूर्ण असलेले पायाभूत सुविधा प्रकल्प कालमर्यादेत पूर्ण करून नागरिकांना सुलभ आणि गतिमान परिवहन सेवा उपलब्ध करून द्यावी असे आदेश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. पुढील वर्षी होणार्या मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने मुंबईतील विकासकामांवर लक्ष केंद्रीत केले आहे. मुख्यमंत्र्यांनी या प्रकल्पांचा आढावा घेताना सर्व प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्याच्या सूचना प्राधिकरणास दिल्या.

त्यासाठी घेतलेल्या बैठकीत एमटीएचएलसह मुंबई, पुणे, नागपूर आणि नाशिक मेट्रो प्रकल्पांच्या कामांची सद्यस्थिती, भविष्यातील नियोजन, निधीची उपलब्धता यासर्व बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मुंबई आणि नवी मुंबई .../२

# गुन्हेशाखा कक्ष-२ कडून दारूसाठा हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहराजवळील मालधक्का झोपडपट्टी पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात गुन्हेशाखा कक्ष–२चे वपोनि गिरीधर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली छापा टाकून देशी–विदेशी मद्यसाठा हस्तगत केला आहे. या प्रकरणी एकाला ताब्यात घेतले आहे.

मालधक्का झोपडपट्टी पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात एक इसम बेकायदेशीररित्या देशी–विदेशी मद्यसाठा जवळ बाळगून असल्याची खबर वपोनि गिरीधर गोरे यांना मिळताच यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक मानसिंग पवार, पोलिस हवालदार प्रशांत काटकर, सहाय्यक फौजदार सुनिल साळुंखे, पोना इंद्रजित कानू, प्रफुल्ल मोरे, दिपक डोंगरे, सचिन म्हात्रे आदींच्या पथकाने छापा टाकून त्याठिकाणी असलेला आरोपी संजय मल्हारी बघाटे (वय–३४) याला ताब्यात घेऊन जवळ बाळगलेला ५ हजार ३०५ रूपयांचा देशी–विदेशी मद्यसाठा हस्तगत केला आहे. याबाबत अधिक तपास पनवेल शहर पोलिस करीत आहेत.

# पवारांची तिसरी आघाडी

महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर तिसरी आघाडी बांधण्यासाठी प्रयत्नशील असल्याच्या बातम्या प्रसिद्ध होऊ लागल्या आहेत. अनुभवी निवडणूक व्यवस्थापक प्रशांत किशोर यांच्याशी झालेल्या त्यांच्या दोन बैठकांपाठोपाठ, मंगळवारी दिल्लीत त्यांच्या घरी झालेल्या आणखी एका बैठकीने या सर्व चर्चेला पुन्हा एकदा प्रारंभ झाला. पवारांचे संघटन कौशल्य वादातीत असले, तरीही या घडीला सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाच्या विरोधात तिसरी आघाडी बांधण्यासाठी पवार स्वतःहून लगेच पुढाकार घेतील, असे समजण्याचे खरे तर कोणतेच कारण नाही. लोकसभेच्या निवडणुकांना अजून तीन वर्षे आहेत. तोपर्यंत सुमारे दहा ते बारा राज्यांच्या विधानसभा निवडणुका होणे अपेक्षित आहे. तिसऱ्या आघाडीत सहभागी होऊ इच्छिणारे अनेक पक्ष आपापल्या राज्यात भाजपच्या विरोधात लढण्याची तयारी करीत आहेत. तिसऱ्या आघाडीचा त्यांना त्यांच्या राज्यात किती फायदा होईल, हे चांगलेच ठाऊक आहे. विधानसभा निवडणुकांसाठी ही आघाडी फार काही मदत करू शकेल, असे त्यांनाही वाटत नसणार; मात्र भविष्यात केंद्रात काही कारणांनी त्रिशंकू परिस्थिती आली, तर त्या वेळेस वाटाघाटी करण्यासाठी किमान एक व्यासपीठ असावे, म्हणूनच या तिसऱ्या आघाडीचा जन्म होणार आहे. वास्तविक, स्वतंत्र भारतामधील राजकारण हे प्रामुख्यान बहुध्रुवीय राहिले आहे. पहिल्या पन्नास वर्षांत तर काँग्रेस एका बाजूला आणि उरलेले डाव्यांपासून ते उजव्यांपर्यंत, म्हणजेच कम्युनिस्ट पक्षांपासून ते तेव्हाच्या जनसंघापर्यंत सगळे जण दुसऱ्या बाजूला, अशीच स्थिती होती. आणीबाणीनंतर झालेल्या निवडणुकांमध्ये जयप्रकाश नारायण यांनी पहिल्यांदाच दुसऱ्या ध्रुवावर असलेल्या सगळ्यांना एकत्र करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. तेव्हा जनता सरकारचा प्रयोग इंदिराविरोधासाठी असल्याने, हे सरकार अंतर्गत दुफळीतून पडले. त्यानंतरही देशाने तिसऱ्या आघाडीचे अनेक पंतप्रधान पाहिले; मात्र त्यांना लोकसभेमध्ये बहुमत सिद्ध करण्यासाठी काँग्रेस किंवा भारतीय जनता पक्षाच्या पाठिंब्याची गरज लागलीच. या सगळ्या प्रवासात भाजपने आपली ताकद वाढवून, भारतीय राजकारण खऱ्या अर्थाने बहुध्रुवीय बनविले. काँग्रेस व भाजप हेच प्रमुख दोन ध्रुव बनले आणि बाकीचे सर्व पक्ष तिसऱ्या ध्रुवावर राहिले. दरम्यान प्रादेशिक पक्षांनी आपली ताकद वाढवित राज्यांमध्ये सत्ता हस्तगत गेली व त्यांनी राष्ट्रीय राजकारणात असलेली पोकळी भरून काढण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यातूनच आघाडीच्या सरकारांचा जन्म झाला. अटलबिहारी वाजपेयी आणि मनमोहनसिंग या दोघांनी अशी आघाडीची सरकारे किमान समान कार्यक्रमाच्या आधारे चालविली. या सगळ्यात पवार यांचा प्रवास काँग्रेसपासून काहीसे दूर राहून; पण त्यांच्याच आघाडीत राहून सत्ता मिळविण्याचा होता. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपने सलग दोन लोकसभा निवडणुकांमध्ये स्वबळावर बहुमत मिळवून, सर्व विरोधकांना एकत्र येण्यास भाग पाडले आहे. २०१९मधील निवडणुकीनंतर तर भाजपला २५ वर्षांहून अधिक काळ साथ दिलेल्या अकाली दल आणि शिवसेनेही त्यांची साथ सोडली. शिवसेनेने तर एक पाऊल पुढे टाकून, थेट काँग्रेसशी आघाडी करीत सरकारही बनविले. त्यातही शरद पवार यांची भूमिका महत्त्वाची होती. आता तोच प्रयोग पवार राष्ट्रीय राजकारणात राबवू इच्छित असल्याचे चिन्हे आहेत. अर्थात, तिसरी आघाडी हा कायमच आतबट्ट्याचा व्यवहार राहिला आहे, ही गोष्ट देशाचे राजकारण गेली पन्नास वर्षे जवळून पाहणाऱ्या पवारांना माहीत असणारच. म्हणूनच, ते या वेळेस ताकही फुंकून पित असावेत. या वेळेस ही आघाडी जुळवितानाची परिस्थिती आणखी वेगळी आहे. ती म्हणजे, प्रादेशिक पक्षांची ताकद या घडीला कधी नव्हे इतकी वाढली आहे. आत्तापर्यंत प्रामुख्याने दक्षिण भारतात असलेले प्रादेशिक पक्ष, आता महाराष्ट्र, ओडिशा यांच्यासहित नर्मदेच्या उत्तरेलाही आपले स्थान आपापल्या राज्यात बळकट करीत असल्याचे चित्र आहे. त्यांना त्यांचे राजकारण करण्यासाठी केंद्राच्या मदतीची आवश्यकता लागणारच आहे; त्यामुळे पुढील दोन-अडीच वर्षे ही मोट टिकविताना तारेवरची कसरत करावी लागेल. प्रचंड महत्त्वाकांक्षा असलेल्या ममता बॅनर्जी यांच्यापासून ते स्टॅलिनपर्यंत आणि हेमंत सोरेन यांच्यापासून ते अरविंद केजरीवाल यांच्यातील प्रत्येकाला हीच ती वेळ असल्याचा साक्षात्कार झाला आहे. त्यामध्ये, 'आमचं ठरलंय' असे म्हणत 'करून दाखवलं' येथपर्यंत पोहोचणे, हे मोठेच आव्हान असेल. त्याशिवाय, पवारांना स्वतःची विश्वासार्हता आणि महाराष्ट्रात शिवसेनेशी असलेली आघाडी टिकविण्याचे आव्हान असेलच. सगळ्यांत शेवटी म्हणजे, आत्तापर्यंतच्या इतिहासाप्रमाणे तिसऱ्या आघाडीला लागणाऱ्या कुबड्या देण्याची ताकद काँग्रेसमध्ये राहील का, याचाही वेध घेत राहावे लागेल. चाणाक्ष शरद पवार तिसऱ्या आघाडीचा प्रयत्न करताना हा हिशेबही लक्षात घेतील, एवढेच आपण गृहित धरू शकतो.

# गोरेगाव येथील पत्राचाळीचा पुनर्विकास म्हाडा करणार हजारो कुटुंबांना दिलासा : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई येथील गोरेगावमधील सिद्धार्थनगर (पत्राचाळ) येथील म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास करून हजारो कुटुंबांना दिलासा देणारा निर्णय आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी पुनर्विकासाचे काम कालबद्धरितीने पूर्ण करण्याचे निर्देशही दिले.

म्हाडा या प्रकल्पाचा स्वत: विकास करेल. हे करीत असताना पत्राचाळ येथील मूळ ६७२ गाळेधारकांच्या पुनर्वसनाचा हिस्सा म्हणून इमारतीचे बांधकाम पूर्ण करून त्यांना रितसर गाळयांचा ताबा देण्यात येईल. म्हाडा हिश्यातील सोडत काढलेल्या ३०६ सदनिकांच्या इमारतींची उर्वरित कामे म्हाडा तातडीने पूर्ण करून संबंधितांना सदनिकांचा रितसर ताबा देण्यात येईल. संपूर्ण पुनर्विकास प्रकल्पाचे काम म्हाडातर्फे पूर्ण करायचे असल्याने प्रकल्पाचे काम म्हाडाने सुरू केल्यानंतर रहिवाशांचे भाडे देण्याचे दायित्व म्हाडाचे आहे. यासंदर्भात उचित निर्णय घेण्याबाबत म्हाडास प्राधिकृत करण्यात करण्यात येईल. तसेच मूळ रहिवाशांच्या थकीत भाड्याबाबत म्हाडाने व्यक्त केलेल्या अभिप्रायानुसार कंपनी लॉ ट्रिब्युनलच्या अंतिम ओदशाची प्रतीक्षा करण्यात यावी. तसेच यानुषंगाने म्हाडाने कंपनी लॉ ट्रिब्युनलकडे सातत्याने पाठपुरावा करावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.



विकासकाने विक्री हिश्श्यासाठी उपलब्ध असलेल्या बांधकाम क्षेत्रफळापेक्षा म्हाडाच्या हिश्श्याच्या जे जास्तीचे ५९,२८१ चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम केले आहे, त्याबाबत विकासकांचे दायित्व तज्ञ तांत्रिक समितीने प्रकल्पाची परिगणना केल्यानुसार म्हाडाने कालबद्ध पद्धतीने ते वसूल करण्याबाबत सर्व कायदेशीर मार्गाचा अवलंब करावा, असेही नमूद करण्यात आले आहे. लेखापरिक्षणानुसार म्हाडाच्या हिश्श्यामध्ये वाढ झालेल्या ८०,७१०.०६ चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम व विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ नुसार ४.०० एफएसआय नुसार अतिरिक्त ७३,२४१ चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम, म्हाडाच्या प्रस्तावानुसार न्यायालयाच्या आदेशाच्या अधीन राहून, म्हाडा हिश्श्याच्या भुखंड क्र.आर-१, २, ३, ४, ५ तसेच विकासक गुरू आशिष यांनी भूखंड वा भूखंडाचे विकास हक्क विक्री केलेल्या ९ विकासकांपैकी ज्या विकासकांकडील भूखंडावर कोणतेही बांधकाम झालेले नाही अशा मोकळया ११ भूखंडांवर चटई क्षेत्र निर्देशांकांच्या जास्तीत जास्त वापराचे नियोजन करून त्यानुसार मिळणारा लाभ म्हाडाने घ्यावा. हे करत असताना म्हाडाचे कोणतेही नुकसान होणार नाही याची म्हाडाने दक्षता घ्यावी, असेही मंत्रिमंडळाने सांगितले.

प्रकल्प आर्थिकदृष्टया सक्षम करणे, म्हाडा हिस्सा व पुनर्वसन हिस्सा यांच्या बांधकाम खर्चापोटी म्हाडास होणारे नुकसान भरून काढण्यासाठी समितीने शिफारस केल्यानुसार, उपलब्ध होऊ शकणारे अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ बाजारभावाप्रमाणे विक्री करण्यास म्हाडा अधिनियम, १९७६ च्या कलम १६४ (१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार म्हाडास एक विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात यावी, असेही नमूद करण्यात आले आहे. म्हाडाच्या स्तरावर उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी तज्ञ तांत्रिक समितीचे गठन करावे. सदर समितीमध्ये म्हाडाचे तीन प्रतिनिधी व २ तज्ञ यांचा समावेश असावा. या प्रकल्पामध्ये म्हाडाला उत्पन्न होणारा महसूल, बांधकाम खर्च, म्हाडाचे येणे इत्यादींची परिगणना या समितीने करावी. समितीने सर्वसंबंधितांना सुनावणीची संधी देऊन त्यांची बाजू ऐकून घ्यावी. हे करत असताना म्हाडाचे कोणतेही नुकसान होणार नाही, याची म्हाडाने दक्षता घ्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले.

# आ.अनिकेत तटकरे यांच्या आमदार निधीतून वरसगाव येथील रस्ता झाला चकाचक

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे विद्यमान आ.अनिकेत तटकरे यांच्या आमदार निधीतून २५ लाख रूपयांच्या निधी प्राप्त झाल्याने रोहे तालुक्यातील वरसगाव येथील प्रलंबित राहिलेल्या रस्त्याचे काम पुर्णपणे मार्गी लागले आहे. येथील पद्मावती नगर ते हॉटेल अनिकेत हा नेहमीचा रहदारीचा असलेला कालव्याचा मार्ग गेली वर्षानुवर्षे कच्च्या स्वरूपात होता. त्यामुळे येथील रहिवासी वर्गाला आपल्या शेती क्षेत्रात किंवा अन्य वहिवाटीच्या वेळेस या रस्त्यावरुन मार्गक्रमण करताना खुप त्रास सहन करावा लागत असे.पावसाळ्यात तर सर्व रस्ता चिखलमिश्रीत झाल्यावर तर येथून प्रवास करणे मोठे जिकरीचे होते. अशा परिस्थितीत वरसगाव ग्रामस्थांनी आपली रस्त्याची व्यथा कोकणचे भाग्यविधाते व रायगडचे खा.सुनील तटकरे,पालकमंत्री आदिती तटकरे व विधान परिषद आ.अनिकेत तटकरे यांच्याकडे कथन केली असता आ.अनिकेत तटकरे यांनी त्वरित दखल घेऊन आपल्या आमदार निधीतून रू.२५ लाखाच्या निधीचे पत्र देऊन व पुढील कार्यवाही पुर्ण करून ग्रामस्थांचा अत्यंत गरजेचा व जिव्हाळ्याचा रस्त्याचा प्रश्न मार्गी लावून खराब रस्त्याच्या त्रासातून सुटका मिळवून दिली आहे. वर्षानुवर्षे ऊन्हाळी हंगामात धुळ तर पावसाळ्यात चिखलमिश्रीत रस्त्यावरुन मार्गक्रमण करताना ग्रामस्थांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असे. परंतू आ.अनिकेत तटकरे यांनी याबाबतचा प्रश्न मार्गी लावल्याने समस्त ग्रामस्थांना मोठाच दिलासा मिळाला असल्याची प्रतिक्रिया येथील माजी सरपंच संजय राजिवले यांनी याबाबत माहिती देताना सांगितले आहे तर रस्त्याचा प्रश्न मार्गी लागल्याने वरसगाव ग्रामस्थ व महिला वर्गाने आ.अनिकेत तटकरे यांचे विशेष आभार मानले आहेत.

# दान पेटीवर डल्ला मारणाऱ्या चोरट्याला १२ तासात अटक

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या मेंदडी येथील गणेश मंदिरात दान पेटीवर चोरट्यांनी डल्ला मारल्याच्या घटना घडली होती. परंतु म्हसळा पोलिसांनी सदर आरोपीला १२ तासात अटक केली आहे. या बाबतची फिर्याद महेंद्र एकनाथ गाणेकर याने दिल्याने म्हसळा पोलीसानी गुन्ह्याची नोंद करून मंदीराचा मागील दरवाजा तोडून चोरट्यानी मंदीरात प्रवेश करून दानपेटी फोडल्याची घटना घडली असे फिर्यादीने सांगितले. तपासी अमलदार रामदास सुर्यवंशी यांनी घटना क्रमाचा अभ्यास करून काही तासातच चोरट्याला जेरबंद केल्याचे सांगण्यात आले. आरोपी अरुण चंद्रकांत बुधे वय ३५ रा. मेंदडी कोंड याला पोलीसानी अटक केली आहे.

# दिघोडे गावात चोरी ; चोरट्यांनी टि.व्ही, पैसेसह सिलेंडर केले लंपास

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

दिघोडे ग्रामपंचायत हद्दीतील बस स्थानकाजवळील दोन दुकानाचे शटर उघडून दुकानातील टि.व्ही, खाद्यपदार्थ, पैसे व दोन सिलिंडर घेऊन पोबारा केल्याची घटना घडली आहे. या संदर्भात दुकान व्यवसायिक परशुराम महादेव पाटील यांनी उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

दिघोडे गावातील दुकान व्यवसायिक परशुराम महादेव पाटील यांच्या कडून मिळालेल्या माहितीनुसार मंगळवार दि२२ जून रोजी दिघोडे ग्रामपंचायत हद्दीतील बस स्थानकाजवळील आपले दुकान बंद करून परशुराम पाटील हे नेहमी प्रमाणे आपल्या घरी गेले होते. सकाळी नेहमीप्रमाणे पनवेल येथील बाजारपेठेत दुकानात लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी जात असताना आपल्या दुकानाचा शटर उघडा असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी सदर प्रकार काय आहे. म्हणून दुकानाकडे धाव घेतली असता दुकानातील टि.व्ही संच, दोन सिलिंडर, रोख रक्कम ७ हजार रुपये तसेच इतर खाद्यपदार्थ अंधारात चोरुन नेल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आले.

परशुराम पाटील यांनी आपल्या दुकानात चोरी झाली असल्याचे ये - जा करणाऱ्या मित्र परिवारांना सांगितले असता त्यांच्या दुकानाजवळील दुसऱ्या ही दुकानात चोरी झाली असल्याचे त्यांच्या कडून सांगण्यात आले. परंतु त्या दुकानात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आल्याने चोरट्यांनी त्या दुकानातून खाद्यपदार्थ चोरुन नेण्यात समाधान मानले आहे.परशुराम पाटील यांनी सदर घटनेचे गांभीर्य ओळखून सदर चोरी संदर्भात उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

# पनवेल तालुक्यात संजय गांधी योजनेचा ४ हजार ८५४ लाभार्थ्यांना लाभ

राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेचा लाभ हा दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नोंद असलेल्या ४० ते ६५ वर्षाखालील वयोगटातील विधवा इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती योजनेंतर्गत निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र असतात.

संजय गांधी निराधार अनुदान या योजनेंतर्गत एकूण ८२ लाभार्थ्यांसाठी रु. ८३ हजार ६००, श्रावणबाळ सेवा राज्य योजना या योजनेंतर्गत एकूण १३ लाभार्थ्यांसाठी एकूण रु.१३ हजार, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा योजना या योजनेंतर्गत एकूण १६ लाभार्थ्यांसाठी एकूण रु.४ हजार ८०० तर राष्ट्रीय कुटुंब योजना या योजनेंतर्गत एकूण २ लाभार्थ्यासाठी रु.४० हजार, अशा प्रकारे एकूण ११३ लाभार्थ्यांसाठी रुपये १ लाख ४१ हजार ४०० इतके अनुदान उपलब्ध असून ही रक्कम थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केली जाणार आहे. दारिद्र्य रेषेखालील गोरगरीब व निराधार असलेल्या पात्र लाभार्थींना केंद्र शासनाकडून रु.२०० प्रति महा व राज्य शासनाकडून संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत रु ४०० असे प्रति महा रु. ६०० मिळत असतात. राष्ट्रीय लाभ योजनेत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील वर्षे १८ ते ५९ या वयोगटातील कमावत्या व्यक्तीचा अपघात झाल्यास आणि त्यात त्याचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियास एकरकमी रु. २० हजार चे अर्थसहाय्य देण्यात देते.

संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती योजना व योजनेखाली पात्र अर्जदाराची माहिती व अर्ज छाननी करुन तहसिलदार किंवा अन्य संबंधित अधिकाऱ्यांनी तयार केलेली माहिती व संबधितांचे अर्ज संजय गांधी निराधार योजना समितीसमोर ठेवण्यात येतात. आतापर्यंत या समितीने पनवेल तालुक्यातून एकूण ४ हजार ८५४ लाभार्थी पात्र ठरविले असून या सर्व लाभार्थ्यांची शासकीय लाभाची रक्कम लाभार्थ्यांच्या थेट बँकेच्या खात्यात जमा होत आहे, अशी माहिती पनवेल तालुक्याचे तहसिलदार श्री.विजय तळेकर यांनी दिली आहे.

# हत्येनंतर मृतदेह फेकला शेलु गावाजवळील नाल्यात ; तिघे अटकेत

असल्याचे समोर आले. त्यामुळे कल्याण गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने नेरळ येथे येऊन तपासाला गती दिली. पोलीस पथकाने प्रविण पाटीलची पत्नी लक्ष्मी आणि तिच्या नातेवाईकांचे कॉल रेकॉर्ड तपासले असता पत्नी लक्ष्मी ही अरविंद उर्फ मेरी रविंद्र राम (वय २०) आणि सन्नीकुमार रामानंद सागर (वय १९) यांच्याशी सतत संपर्कात असल्याचे समोर आले होते.

त्या तिघांना पोलिसांनी ताब्यात घेऊन चौकशी केली असता, अरविंद आणि लक्ष्मी यांचे अनैतिक संबंध असल्याचे समोर आले. यावरु सारखी चिडचिड सुरु होती. त्यामुळे पत्नी लक्ष्मी, तिचा प्रियकर अरविंद आणि सन्नीकुमार या तिघांनी प्रवीणचा काटा काढण्याचे ठरवले. त्यांनी प्रविण धनराज पाटीलवर लोखंडी रॉडच्या सहाय्याने हल्ला करून आणि नंतर गळा दाबून त्याची हत्या केली आणि मृतदेह प्लॅस्टीकच्या चटईत गुंडाळून ऑटो रिक्षातून शेलू गावाशेजारील नाल्यात फेकून दिला. त्यानंतर ते पुन्हा डोंबिवली येथे परतले. घटनेचा उलगडा झाल्यानंतर कल्याण गुन्हे शाखेने लक्ष्मी प्रविण पाटील, अरविंद उर्फ मेरी रविंद राम आणि सन्नीकुमार सागर या तिघांना अटक करुन न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली असून गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजू जॉन हे अधिक तपास करीत आहेत. दरम्यान, कल्याण गुन्हे शाखेच्या पथकाने नेरळ पोलिसांचे गुन्ह्यातील तपासकामी केलेल्या मदतीबद्दल आभार मानले आहे.

# एसटीच्या डिझेलच्या निधीत दीड कोटींचा घोळ

पगारा करीता वापरल्याने रायगडातील एसटीचा चक्काजाम होण्याची भिती व्यक्त करण्यात येत आहे. कारण कोणती डिझेल कंपनी एसटीला डिझेल उधारीत देत नाही. त्यामुळे त्याचे पैसे त्वरित अदा करावे लागतात. सदरची रक्कम इतर ठिकाणी वापरल्याने चक्काजाम होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. एसटीच्या रायगड विभागीय कार्यालयात लेखाधकारी म्हणून कार्यरत असलेले राजेंद्र परदेशी यांची या प्रकरणात अंतिम जवाबदारी असते. घाईगडबडीने कामे उरकण्यामुळेच हा दीड कोटी रुपयांचा आर्थिक घोळ झाला असल्याची चर्चा एसटी कर्मचाऱ्यांमध्ये सुरू आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर कारवाई करण्यात येईल अशी माहिती रायगड विभागीय नियंत्रक अनघा बारटक्के यांनी दिली.

# न्हावाशेवा-शिवडी सागरी पूल सप्टेंबर २३ मध्ये पूर्णत्वास : एमएमआरडीए

दरम्यानच्या या २२ किमी लांबीच्या सागरी मार्गामुळे लोकांचा प्रवासाचा वेळ ४० - ५० मिनिटांनी वाचणार आहे. या प्रकल्पाचे ३५ ते ४० टक्के काम पूर्ण झाले असून सप्टेंबर २०२३ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्यात येईल असे सादरीकरणा दरम्यान सांगण्यात आले. तसेच मुंबईतील सुमारे १४ मेट्रो मार्गिका प्रकल्पाद्वारे ३३७ किलोमीटर लांबीचे मेट्रोचे जाळे निर्माण होणार आहे. त्यावर मेट्रोची कामे अनेक ठिकाणे सुरू असून कामाच्या ठिकाणी पावसाचे पाणी साचणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.एमयुटीपी ३ - ए प्रकल्पांतर्गत उपनगरीय रेल्वे सेवांचा विस्तार,उपनगरीय स्थानकांचेआधुनिकीकरण आदी कामांचा समावेश असल्याचे मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक खुराणा यांनी सांगितले.


श्री.भाकरे सो.कोर्ट

ॲड.सुजाता पाटील ८८७९४१६४८३

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.४३७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२७/०७/२०२१

श्री.बाळा गुन्तका रेड्डी — अर्जदार
विरुद्ध
गुन्तका अकम्मा त्रिरुपाताया व इतर — सामनेवाले

वरील अर्जदार यांचे वडील व सामनेवाले नं.१ यांचे पती तसेच सा.नं.२ ते ४ यांचे वडील कै.श्री.गुन्तका वेंकाटाया त्रिरुपाताया यांचे दि.०१/०२/२०२१ रोजी खारघर, तालुका : पनवेल येथे निधन झाले आहे. कै.श्री.गुन्तका वेंकाटाया त्रिरुपाताया यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मालमत्ता परिशिष्ट**
**वास्तुशिल्प सोसायटी, फ्लॅट नं.३०३, तिसरा मजला, प्लॉट नं.१७९, सेक्टर १०, खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड-४१०२०६**
**क्षेत्रफळ ५०.१७२ चौ.मी. व ओपन टेरेस १.९३ चौ.मी.**
**मालमत्ता मुल्यांकन : रुपये २०,००,०००/- (अक्षरी विस लाख मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत मे.न्यायालयात अर्ज केलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२३/०६/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकांकडून कायमची विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, बयाणापावती, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमूद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास सदरच्या मिळकतीत कोणाचाही कुठलाही हक्कहितसंबंध नसून वा असल्यास तो कायमचा सोडून दिला आहे असे समजून माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या बिनशेती जमीन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे : नालधे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | चौ.मी. | रुपये | पैसे |
| जसतेज सिंग रीन | ७८ | ४५ | ८४० | ८४ | ०० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**कार्यालयीन पत्ता : मु.पो.कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१**

**सही/-**
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
**(ॲडव्होकेट)**
**दिनांक : २४/०६/२०२१**
**मो.नं.९१५८२७७७२८**



## PUBLIC NOTICE

This is to inform you all people, as per instruction of my clients 1)Mr.Manoj Kumar Mevalal Sharma, 2) M/s Taran Ventures Pvt. Ltd Shree. Rajeev A. Nair and 3) Mr.Bharat Dungarshibhai Patel having add. At S111, Agarwal Trade Centre, Plot No.62, Sector 11, Belapur CBD,Navi Mumbai.

My clients and Mrs.Dhanlakshmi S. Nair residential at. Flat No.202, Shree Shradha Avanue, Plot No.62, Sector 20, Kamothe, Navi Mumbai are partners of M/s Shiv Construction Partnership Firm. The said firm was establish on 28/08/2010 by way of Notarized Partnership Deed.

One partner of the Mrs.Dhanlakshmi S. Nair has breach the terms and conditions of the said Partnership Deed, so other partners was decided to remove her from partnership Deed. my client sent notice to Mrs.Dhanlakshmi S. Nair as per Indian Partnersh ip Act Section 32 on 01/02/2021 by way of Reg.A. D.

This to inform you all peoples that Mrs.Dhan lakshmi S. Nair has no right, title or interest on the poperty, loan, mortagage, lien or gift of the said firm.

Sd/-
**Adv.Mariya Koli**
1 st flr, Shree Perna Apt.
Uran, Tel-Uran, Dist-Raigad
Mo.9702209114
Email : mariya.koli@yahoo.com



## जाहीर सूचना

यह जाहीर सूचना है की, मेरे मुवक्कील १) श्री.मनोज कुमार मेवालाल शर्मा, २) मे. तरन व्हेंन्चर्स प्रा.लि.तर्फसे, श्री.राजीव अ. नायर, ३) श्री.भरत डुंगरशीभाई पटेल, पत्ता : एस.१११, अगरवाल ट्रेड सेंटर, प्लॉट नं.६२, सेक्टर ११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ और श्रीमती.धनलक्ष्मी श्री नायर पत्ता : फ्लॅट नं.२०२, श्री श्रद्धा ॲव्हेन्यू, प्लॉट नं.६५, सेक्टर २०, कामोठे, नवी मुंबई यह सभ मेसर्स शिव कन्स्ट्रक्शन्स साझेदारी विलेख के साझेदार है!

यह मेसर्स शिव कन्स्ट्रक्शन्स साझेदारी विलेख तारीख २४/०८/२०१६ रोज को नोटराईज्ड की गई है! इस साझेदारी विलेख की साझेदार-श्रीमती. धनलक्ष्मी श्री नायर इन्होंने अपने अधिकारोका गैरइस्तमाल करते हुंऐ साझेदार विलेख के नियम और शर्तो का उल्लंघन किया है! इसी कारण से मेरे मुवक्कील इन्होंने साझेदारी अधिनियम १९३२ की धारा ३२ के तहत श्रीमती.धनलक्ष्मी श्री नायर इनको इस साझेदारी विलेखसे बाहर निकालने के लिऐ तारीख ०१/०२/२०२१ रोज को रजि. ए. डी. द्वारा लिखित में सूचना भेजी गई है!

इस लिए यह जाहीर सूचना द्वारा तमाम लागों को सूचित किया जाता है की, मेरे मुवक्कील मेसर्स शिव कन्स्ट्रक्शन्स तर्फसे साझेदार १) श्री.मनोज कुमार मेवालाल शर्मा, २) मे.तरन व्हेंन्चर्स प्रा.लि.तर्फसे श्री.राजीव अ.नायर, ३) श्री.भरत डुंगरशीभाई पटेल पत्ता : एस.१११, अगरवाल ट्रेड सेंटर, प्लॉट ६२, सेक्टर ११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ इन्होंने श्रीमती. धनलक्ष्मी श्री नायर को मेसर्स शिव कन्स्ट्रक्शन्स इस साझेदारी विलेखसे बाहर निकाल दिया है! अब श्रीमती.धनलक्ष्मी श्री नायर इन्हका मेसर्स शिव कन्स्ट्रक्शन्स इस साझेदारी विलेख औंर उसके कोईभी हिस्सेपर, बिक्री, गिरवी वस्तू, ऋण, दान या अन्य किसीभी प्रकार का कोई भी हक्क, अधिकार और वास्ता नहीं राहा है!

**सही/-**
**ॲड.मारिया कोळी**
**१ मजला, श्री प्रेरणा अपार्टमेंट, उरण, ता.उरण, जि.रायगड**
**मो.नं.९७०२२०९११४**
Email : mariya.koli@yahoo.com


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## आंबेवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रात नागरिकांनी घेतला कोविड शिल्डचा लाभ

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

प्राथमिक आरोग्यकेंद्र आंबेवाडी येथे दि. २०जून २०२१ ला कोविड शिल्ड चा ७०डोसांचा साठा उपलब्ध होता. याचा लाभ परिसरातील ७० नागरिकांनी घेतला. विशेष म्हणजे या प्राथमिक आरोग्यकेंद्रातून लसीकरण घेतल्या नंतर घरी गेलेल्या नागरिकांची दूरध्वनीद्वारे तब्येतीची विचारपूस आंबेवाडी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सहाय्यिका सौ. रेश्मा रविंद्र पानसरे नियमितपणे करत असतात. जर एखाद्या व्यक्तीला ताप वगैरे आला असेल तर त्या व्यक्तीस योग्य तो सल्ला देत असतात.

प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडीचे वैद्यकीय अधिकारी श्री. कृष्णा चव्हाण, डॉ. अंकिता भोईर तसेच आरोग्य सेविका रीना रेवाळे, आरोग्य सेवक श्री. गणेश शिरसाट, गटप्रवर्तक प्रिती मोरे, स्टापनर्स स्वप्नाली जांभळे त्याच प्रमाणे आरोग्य सहाय्यक श्री. गायकवाड व वाहन चालक किशोर महाडिक आदिंचे सहकार्य कोरोना काळात अत्यंत महत्त्वाचे ठरत असून परिसरातील नागरिक त्यांना धन्यवाद देत आहेत.

## मतदार ओळखपत्रासाठी छायाचित्रे सादर करण्याचे पाली तहसील कार्यालयाचे आवाहन

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

विधानसभा मतदार संघ १९१ पेण सुधागड तालुक्यातील ज्या मतदारांची मतदार यादीत नाव नोंदणी झाली आहे. परंतु त्यांची छायाचित्रे नाहीत त्यांनी ती ताबडतोब सादर करावी असे आवाहन पाली-सुधागड दिलीप रायण्णावार यांनी केले आहे. अन्यथा छायाचित्र नसलेल्या मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात येतील असे देखील तहसीलदारांनी सांगितले.

छायाचित्र नसलेल्या मतदारांना वेळोवेळी सूचना देऊनही त्यांनी मतदान ओळखपत्रासाठी आपले छायाचित्र अद्याप पर्यंत सादर केलेले नाही. अशा मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात बाबत निवडणूक आयुक्तांकडून निर्देशित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने मतदारांचे छायाचित्र घेण्यासाठी निवडणूक विभागाच्या निर्देशानुसार सुधागड तालुक्यात संपर्क अभियान राबविण्यात येत आहे. तरी ज्या मतदारांचे मतदार यादीत छायाचित्र नाही अशा मतदारांनी निवडणूक ओळखपत्रासाठी आपले छायाचित्र तहसील कार्यालय सुधागड पाली (निवडणूक विभाग) किंवा ऑनलाइन पद्धतीने अथवा मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याशी संपर्क करावा. अशी माहिती पाली सुधागड तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी दिली. लोकशाही पद्धतीत मतदान करणे हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे या अधिकारा प्रती प्रत्येकाने जागरूक राहून आपले छायाचित्र मतदार ओळखपत्र तयार करून घेण्यास सहकार्य करावे असे आवाहन देखील पाली-सुधागड तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी केले आहे.


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# खा.सुनील तटकरे यांच्या आदेशान्वये महामार्गावरील अपघातग्रस्त मोरीचे बांधकामास प्रारंभ

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**



मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गावरील कोलाड नजीकच्या पुई गावचे हद्दीत अर्धवट स्थितीतील बांधकाम करून ठेवलेल्या व अपघातास कारणीभूत ठरत असलेल्या मोरीचे बांधकाम लवकरात लवकर पुर्ण करण्याचे आदेश खा.सुनील तटकरे यांनी दिल्याने अखेर संबंधित यंत्रणेने याची त्वरीत दखल घेऊन मोरीचे बांधकामास युद्धपातळीवर प्रारंभ करण्यात आला आहे.

महामार्गाचे बांधकामात सदरच्या मोरीचे विस्तारीकरण करणे आवश्यक असल्याने संबंधित शासकीय यंत्रणा व ठेकेदार यांच्याकडून तशाप्रकारचे बांधकामास प्रारंभही करण्यात आला. परंतू मधल्या काळात वारंवार बदलेले ठेकेदार, नवे आलेले सरकार व नव्याने रूजू झालेले अधिकारी वर्ग यामुळे सदरचे मोरीचे व महामार्गावरील अन्य बांधकाम यांना म्हणावी तशी गती मिळत नसल्याने गेली पाच ते सहा वर्षे सदरच्या मोरीचे बांधकामही अर्धवट स्थितीतच राहिल्याने फारच मोठी समस्या निर्माण होत होती. अर्धवट मोरी, तिथला अरूंद रस्ता व संबंधित यंत्रणेने याबाबत कोणतीही सुरक्षा न ठेवल्याने इथल्या मोरीचा भाग म्हणजे अपघातासाठी हॉटपॉट ठरत चालला होता.तर आतापर्यंत रात्री बेरात्री विविध प्रकारच्या वाहनांचा अपघात झाले असल्याच्या घटनाही घडल्या आहेत.

सदरील मोरी अपघातासाठी हॉटपॉट ठरत असल्याने व भविष्यात पुन्हा एखादी मोठी घटना घडू नये यासाठी खांब- कोलाड विभागातील राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा कार्यकर्ते यांनी खा.सुनील तटकरे व आ.अनिकेत तटकरे यांच्याजवळ याबाबत या गंभीर मोरीची समस्या मांडली असता खा.सुनील तटकरे व आ.अनिकेत तटकरे यांनी त्वरीत संबंधित शासन यंत्रणा व ठेकेदार यांना दिलेल्या आदेशान्वये सदरचे मोरीचे बांधकामास युद्धपातळीवर प्रारंभ करण्यात आला आहे. तर याबाबत खा.सुनील तटकरे व आ.अनिकेत तटकरे यांचे दैनंदिन प्रवासी, वाहनचालक व स्थानिक रहिवासी वर्गाने आभार मानले आहेत.

# पोलादपूर तालुक्यातील धारवली गावात लसीकरण ; कोरोनाविरोधात गावोगाव लसीकरणामुळे जनजागृती

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील धारवली कोरोना नियंत्रण कक्ष आणि स्वदेस फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने श्रीदत्तमंदिर धारवली व ग्रामपंचायत कार्यालय येथे कोरोना प्रतिबंधक लसीकरण १६० जणांना करण्यात आले.

धारवली सप्तक्रोशी विभागातील लोकांना लस घेता यावी आणि त्यासाठी लांब पोलादपूर येथे न जाता धारवली ग्रामपंचायतीमध्येच लसीकरण मोहीम राबवता येण्यासाठी सरपंच अश्विनी विश्वास सातपुते यांनी विशेष प्रयत्न केले. धारवली ग्रामपंचायतीच्या सरपंच अश्विनी सातपुते यांच्यासह सदस्य विलास सकपाळ, काळवली सरपंच शांताराम महाडिक, ग्रामसेवक उमेश मनवे व वानखेडे तसेच नोडल अधिकारी प्रदीप पवार, राहुल सोळंकी, पोलीस पाटील रोशन सकपाळ, हर्षल सातपुते, शौकत चाफकर, मुख्याध्यापक पवार, भिकू कुळे तसेच शेकाप तालुका युवक अध्यक्ष हर्षल सातपुते यांनी पाठपुरावा केला.

यावेळी पळचिल आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.सुरेखा बोराडे, आरोग्य सेविका कांबळे, परिचारक शेखर म्हामूणकर, आशासेविका किरण जैतपाल, मनिषा कुळे, स्वदेस फाऊंडेशनच्या हेल्थ को ऑर्डीनेटर डॉ. सुप्रिया सकपाळ, कोऑर्डिनेटर सागर देवे व शरद निविलकर यांचे सहकार्य लाभले. पोलादपूरच्या तहसिलदार दिप्ती देसाई, गटविकास अधिकारी धनंजय जगताप, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.गुलाबराव सोनावणे यांनी यावेळी लसीकरण शिबिराला भेट देऊन या सप्तक्रोशी परिसरातील ग्रामस्थांसाठी लवकरच लसीकरणाचे शिबीर आयोजित केल्यास अधिकाधिक ग्रामस्थांना कोरोनापासून प्रतिबंधित करणे शक्य होईल, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून अधिकाऱ्यांकडे व्यक्त करण्यात आली.

# आ.रविशेठ पाटील यांच्याकडून पेण मतदारसंघात औषधाचे किट वाटप




**दै.रायगड नगरी । पेण**

पेण सुधागड पाली रोहा मतदार संघात भारतीय जनता पार्टीचे आमदार रवीशेठ पाटील यांच्या आमदार फंडातून संपूर्ण मतदारसंघात कोरोना व करोना माहामारी प्रसार रोखण्यासाठी संपूर्ण मतदारसंघात औषधाचे किट वाटप करण्यात आले.

पेण मतदार संघातील हमरापुर विभागातील दादर, रावे, कळवे, सोनखार, जोहे आदी गावात जाऊन वैकुंठ पाटील माजी विरोधी पक्षनेते जिल्हा परिषद यांनी ग्रामपंचायत कार्यालयामध्ये जाऊन कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी औषधाचे किट वाटप करण्यात आले. यावेळी गावातील सरपंच ग्रामसेवक आशा सेविका यांनी कोणाला व कशी औषधे द्यावीत हे सांगून कोरण्याचा प्रसार रोखण्याचे आव्हान केले. कोरोना काळात आमदार रवीशेठ पाटील यांनी पेण शहरासह मतदारसंघात पाच ऍम्ब्युलन्स दिल्या असून शहरासह ग्रामीण भागात कोविड सेंटर उभारले आहेत यामुळे मतदारसंघात कोरोना कसा आटोक्यात येईल त्यावर आमदार रवीशेठ पाटील लक्ष ठेवून आहेत. असे वैकुंठ पाटील यांनी या वेळी संगितले.

# पर्यटन सुरू करण्यासाठी माथेरान मनसेचा ठिय्या आंदोलनाचा इशारा

**दै.रायगड नगरी । माथेरान**



राज्यातील इतर पर्यटक्षेत्रे सुरू होत असताना माथेरानचे पर्यटन सुरू करण्याची शासनाकडून कोणतीही हालचाल दिसत नसल्याने माथेरान मनसे ने २८ तारखेपर्यंत माथेरानचे पर्यटन सुरू न झाल्यास पालिका कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन करणार असल्याचे पत्र येथील मुख्याधिकाऱ्यांनी दिले.

मागील पंधरा महिन्यांपासून माथेरानचे पर्यटन बंद आहे ह्या काळामध्ये येथील स्थानिकांचा रोजगरच हिरावल्याने त्यांच्यावर कर्जाचे डोंगर उभे राहिले आहेत. त्यातच शासनाकडून कोणतीही मदत होत नसल्याने चिंता वाढत आहे वीज बिले भरता न आल्याने अनेकांच्या जोडण्या तोडण्यात आलेल्या आहेत. वीज, पाणी बिले व स्थानिक पालिकेच्या भूभाड्यामध्ये सवलत मिळावी ही मागणी ही धूळ खात पडून आहे. येथील व्यवसायिकना शासनाकडून मदतीचे फक्त आश्वासन मिळाले आहे पण कृतीमात्र शून्य असल्याने येथील सर्वच राजकीय पक्ष व सामाजिक तसेच व्यापारी संघटनांनी पर्यटन सुरू करून स्थानिकांचा रोजगार सुरू करावा अशी मागणी केली आहे. पण त्यास प्रशासनाकडून कोणताही प्रतिसाद अजून पर्यंत लाभलेला नाही. दोन दिवसांपूर्वी महाबळेश्वर, पंचगणी ही पर्यटन स्थळे विशेष अधिकार वापरून सुरू करण्यात आली पण रायगडमधील एकमेव डोंगरावरील पर्यटन केंद्राबाबत मात्र प्रशासन ही भूमिका घेऊ शकलेले नाही. त्यामुळेच आता माथेरान नवनिर्माण सेनेने येथील नगरपालिका, अधीक्षक कार्यालय व पोलीस ठाणे येथे लेखी निवेदन देऊन जर २८ तारखेपर्यंत माथेरानचे पर्यटन सुरू झाले नाही तर नगरपालिका कार्यालयाबाहेर मनसे शाखातर्फे ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. ह्यावेळी मनसे शहर अध्यक्ष संतोष कदम, रवींद्र कदम, असिफ खान, संतोष केलगणे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर केला बलात्कार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आपल्या पत्नीस घटस्फोट न देता आपण घटस्फोट देणार असल्याचे खोटे सांगून तुझ्याशीच लग्न करणार असे फिर्यादीस खोटे आमिष दाखवून, धमकी देऊन तिच्या इच्छेविरूद्ध जबरदस्तीने वारंवार शारिरिक संबंध प्रस्थापित करून बलात्कार केल्याची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

करंजाडे येथे राहणाऱ्या सदर महिलेला त्यांच्या परिचयाच्या एका इसमाने मी आता आपल्या पत्नीस घटस्फोट देऊन तुझ्याशीच लग्न करणार असे तिला खोटे आमिष दाखवून, धमकी देऊन तिच्या इच्छेविरूद्ध जबरदस्तीने वारंवार शारिरिक संबंध प्रस्थापित करून बलात्कार केल्याची तक्रार करण्यात आली. सदर घटनेनंतर आरोपी पसार झाला असून त्याचा शोध पनवेल शहर पोलिस करीत आहेत.

---

मुजावर साो.

वकील : ॲड.सचिन अं. म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर साो.यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.५६६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०७/२०२१

१) श्रीमती.सुगंधा भगवान खानावकर
वय : ६५ वर्षे, व्यव : गृहिणी
२) श्री.विनोद भगवान खानावकर
वय : ४३ वर्षे, व्यव : नोकरी
३) श्री.विशाल भगवान खानावकर
वय : ४२ वर्षे, व्यव : नोकरी
४) श्री.विजय भगवान खानावकर
वय : ४० वर्षे, व्यव : नोकरी
वरील १ ते ४ रा.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.सुवर्णा शोकीन केणी
वय : ३८ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.पेठाली, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, कै.भगवान काशिनाथ खानावकर, यांचा मृत्यू दि.०६/१२/२०१६ रोजी मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले असून, त्यांचे खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळणे करिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे/युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| नावडे/१५५/७४+७५ | ६८ | ४ | ००-२३-०४ | २.६९ |
| नावडे/६१ अे/७२ | २४६ | १४ | ००-४६-०५ | ३.०६ |
| नावडे/४०/७५ | ११२ | २+५ | ००-४०-०७ | ६.७५ |
| पेंधर/७८+९८ | २४ | ३ | ००-१२-०१ | १.८१ |
| | २६ | २ | ००-१५-०९ | २.७५ |
| | ६५ | ८ ब+९ ब | ०-१८-०७ | २.४४ |

वरील अर्जदार हे कै.भगवान काशिनाथ खानावकर, यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २३/०६/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल

---

मा.गोडसे साो.

वकील : ॲड.सचिन अं. म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर साो.यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.५६५/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२८/०७/२०२१

१) श्रीमती.शकुंतला गोपीनाथ खानावकर
वय : ६७ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.कविता परशुराम म्हात्रे
वय : ४९ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.घणसोली, ता.जि.ठाणे
३) श्री.सुशांत गोपीनाथ खानावकर
वय : ३६ वर्षे, व्यव : नोकरी
४) सौ.रुपाली विनोद परदेशी
वय : ३३ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.कातळपाडा, चिरनेर, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, कै. गोपीनाथ काशिनाथ खानावकर, यांचा मृत्यू दि.१५/०७/२०१७ रोजी मौजे : नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले असून, त्यांचे खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळणे करिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे/युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| नावडे/१५५/७४+७५ | ६८ | ४ | ००-२३-०४ | २.६९ |
| नावडे/६१ अे/७२ | २४६ | १४ | ००-४६-०५ | ३.०६ |
| नावडे/४०/७५ | ११२ | २+५ | ००-४०-०७ | ६.७५ |
| पेंधर/७८+९८ | २४ | ३ | ००-१२-०१ | १.८१ |
| | २६ | २ | ००-१५-०९ | २.७५ |
| | ६५ | ८ ब+९ ब | ०-१८-०७ | २.४४ |

वरील अर्जदार हे कै.गोपीनाथ काशिनाथ खानावकर, यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक २२/०६/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल

---

Hon'ble Godase Madam

Adv.Kiran D. Sawant

### Public Notice

IN THE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION, PANVEL

Misc. Application No.590 Of 2021
Exh. 7/D
N.D.28/07/2021

Mr.FRANCIS DANIEL HARRIS — Applicants
Versus
NO ONE — Respondents

The public notice informs that the deceased Rodney Francis Harris passed away on 09/08/2017 in Texas, USA. The deceased Rodney Francis Harris had and still has the following descriptions in his name at the time of his death.

**Deceased Person Property Description-**
At New Panvel, Taluka-Panvel, Dist-Raigad, Pin 410206

| Sr. No. | Description of the Properties |
|---|---|
| 1 | Flat No.1401, Tulsi Heights CHS LTD, Gurudwara, Plot No.-1, Sector-5, New Panvel (E) St. Joseph School, Panvel, Raigad-410206 |

The property described above is in the name of the late Rodney Francis Harris and as the deceased Rodney Francis Harris is deceased, the applicant has applied to the Hon'ble Court for a certificate of succession.

Anyone who thinks that the applicant is not the heir of the late Rodney Francis Harris and if anyone else has any objection to the issuance of the certificate of inheritance, they themselves or their lawyer must object within 30 days from the date of publication of the public notice.

The document should be submitted to the Hon'ble Court along with the evidence. Assuming that there is no objection if there is no objection within the said period, the Hon'ble Court will provide the heir certificate to the applicant and the objection after the term will not be considered.

In 2021, I signed and sealed the court order.

Place-Panvel
Date - 23/06/2021

Sd/- Jr. Clerk Civil Court Panvel | Court Seal | Sd/- Assit.Superintendent Civil Court Panvel

---

राव साहेब

ॲड.शशिकांत काळू म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.५५७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.४/०८/२०२१

१) श्री.तुळशीराम दगडू म्हात्रे
वय : ६२ वर्षे, धंदा : शेती
रा.रुम नं.५९, टाटा हॉस्पिटल जवळ,
उर्दू शाळेजवळ, सेक्टर ३०, ओवे विल्लेज,
ओवे खारघर, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.बेबीबाई राघो पोरजी
वय : ७५ वर्षे, धंदा : शेती
रा.राघो पोरजी, मु.धानसर, पो.तळोजा,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ व २ यांचे वडील कै.दगडू हिरा म्हात्रे हे दि.१२/०१/२०२१ रोजी मौजे : माऊली कृपा निवास, घर नं.४०, ओवे, से.३०, खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले आहे. तसेच त्यांची पत्नी कै.बामीबाई दगडू हिरा म्हात्रे ह्या दि.२८/०७/२०१९ रोजी मौजे : माऊली कृपा निवास, घर नं.४०, ओवे, से.३०, खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाल्या आहेत. कै.दगडू हिरा म्हात्रे यांच्या आई आंबिबाई हिरा म्हात्रे या मौजे : ओवे, पो.खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे फार वर्षापूर्वी मयत झाल्या आहेत.

कै.दगडू हिरा म्हात्रे यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| ओवे | ५७७ | ३१९ | ६ | १-३-०<br>०-५-४ |
| ओवे | ५७७ बी | ३२० | ४ | ०-२६-४ |

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा अवॉर्ड हा कै.दगडू हिरा म्हात्रे यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.दगडू हिरा म्हात्रे यांचे वारसदार या नात्याने कै.दगडू हिरा म्हात्रे यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.सह दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.दगडू हिरा म्हात्रे यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख २३/०६/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## अल्पवयीन मुलाचे अपहरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका १७ वर्षीय मुलगा हा त्याच्या कुटूंबासमवेत गावी जाणार असल्याने प्रवासात लागणाऱ्या पाण्याच्या बाटल्या विकत घेण्याकरीता त्याला आणण्यास सांगितले असता तो त्या बाटल्या घेऊन परत न आल्याने त्याचे कोणीतरी अपहरण केल्याची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

सदर मुलगा हा अंगाने मजबूत, रंगाने सावळा, डोळे काळे, केस काळे बारिक, नाक सरळ, अंगात काळ्या रंगाचा फूल शर्ट व चॉकलेटी रंगाची फूल जीन्सपँट घातली आहे. या मुलाबाबत कोणास अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा.

## ईको गाडीच्या सायलेंन्सरची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मारूती सुझूकी ईको गाडीच्या लोखंडी सायलेंसरची चोरी करंजाडे येथे केल्याची घटना घडली आहे.

विरकाराम भीमाजी देवासी (वय-४२, रा.-करंजाडे) यांच्या ताब्यातील मारूती सुझूकी ईको गाडीचे लोखंडी सायलेंसर ज्याची किंमत जवळपास २० हजार आहे. हे अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## इसम बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक इसम कोठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार खांदेश्वर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. निलेश सोमवार शेळके (वय-२६, रा.-सूकापूर) असे नाव असून रंग निमगोरा, उंची ५ फूट ५ इंच, चेहरा उभट, दाढी फ्रेंच कट, नाक बसके जाड, शरिर मध्यम, केस लांब, डोळे काळे, दोन्ही हातांवर गोंदलेले, डाव्या हातावर भाजलेली खूण असून अंगात पिवळ्या फूल बाह्यांचा टिशर्ट व काळ्या रंगाची जीन्स पँट पायात काळी व लाल रंगाची पट्टा असलेली स्लिपर, सोबत सफेद शर्ट आहे. मोबाईल फोन आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेने इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात वाहनाच्या धडकेने एका इसमाचा दुर्दैवी मृत्यु झाल्याची घटना पनवेल जवळील पुणे-मुंबई एक्सप्रेस महामार्गावर घडली असून या प्रकरणी पनवेल तालुका पोलिसांचे पथक अज्ञात वाहन तसेच मयत इसमाच्या नातेवाईकांचा शोध करीत आहेत.

सदर इसम हा पुणे-मुंबई एक्सप्रेस महामार्गावरून पुणे बाजूस किमी १२.६०० येथून पायी जात असताना त्यास कोणत्यातरी अज्ञात वाहनाच्या चालकाने जोरदार धडक देऊन त्याच्या मृत्युस कारणीभूत ठरून तो आपल्या वाहनासह निघून गेला आहे.

# ऑनलाईन शिक्षण सुरू पण, स्मार्टफोन आणि इंटरनेटचे विघ्न

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे शाळा बंद त्यामुळे यंदाही ऑनलाईन शिक्षणाला सुरुवात झाली. मात्र स्मार्टफोनचा अभाव आणि इंटरनेटचा व्यत्यय यामुळे ऑनलाईन शिक्षण ग्रामीण, दुर्गम, आदिवासी वाडी व वस्तीवरील मुलांपर्यंत पोहचणे दुरापास्त झाले आहे. परिणामी कोणी स्मार्टफोन देते का स्मार्टफोन असे बोलण्याची वेळ पालक व शिक्षकांवर आली आहे.



जिल्ह्यातील बहुतांश विद्यार्थी व पालक यांच्याकडे स्मार्टफोन नसल्याने विद्यार्थी ज्ञानकण गिरवणार कुठे हा प्रश्न भेडसावत आहे. मागील वर्षी भारतीय तंत्रज्ञान संस्थे ने (आयआयटी) एक सर्वेक्षण प्रसिद्ध केले. त्यात असे आढळून आले की विद्यार्थ्यांच्या वर्गाच्या तुलनेत ऑनलाईन तासात सहभाग हा ५६% असमाधानकारक तर शिक्षकांचं ऑनलाईन शिकवण्याचा अनुभव हा ७४% असमाधानी आलाय त्यातून काही निष्कर्ष असे की प्रशिक्षण गरज, कमी उपस्थिती, डेटा आवश्यक, प्रश्नाचे निराकरण अशक्य, गृहपाठ अपूर्ण त्यामुळे ७०% विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणाबद्दल असमाधानी आहेत असा हा अहवाल अधोरेखित करतोय. त्यात स्मार्टफोन व इंटरनेटचा अभाव, त्यामुळे शिक्षकांना ऑनलाईन व ऑफलाइन या दोन्ही मार्गाने जावे लागतेय. असे राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक राजेंद्र आंबिके यांनी सकाळला सांगितले.

वांगणी माध्यमिक विद्यालयातील उपक्रमशील शिक्षक टिळक खाडे यांनी सांगितले की ऑनलाइन शिक्षणासाठी आवश्यक असणारा स्मार्टफोन ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांकडे नसल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणापासून वंचित राहत आहेत. काही दुर्गम व डोंगराळ भागात इंटरनेट व मोबाईल नेटवर्क नसल्यामुळेही ऑनलाईन शिक्षणात अडथळे येत आहेत. कोरोनामुळे शाळेतील प्रत्यक्षात बंद असलेले अध्ययन - अध्यापन व ऑनलाईन शिक्षणातील अडथळ्यांची शर्यत यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची परवड होत आहे. कोरोना काळात रोजगार नसल्यामुळे ग्रामीण भागातील पालक महागडा स्मार्टफोन व इंटरनेट सुविधा आपल्या मुलांना उपलब्ध करुन देऊ शकत नाहीत . त्यामुळेच ग्रामीण भागातील शाळांमधील शिक्षकांसमोर ऑनलाईन शिक्षण कसे द्यावे असा प्रश्न पडला आहे. तर पडसरे आश्रमशाळेतील टेक्नोसॅव्ही शिक्षक राजू मोरे म्हणाले की आम्ही गावोगावी वाडीवस्तीवर जाऊन तेथील तरुण व कॉलजेच्या मुलांचे मोबाईल स्थानिक विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी घेत आहोत. तरी पण अडचणी आहेतच

परिस्थिती अशी आहे की ज्यांची मुले आश्रमशाळेत किंवा जिल्हा परिषद शाळेत आहेत त्या पालकांकडे मोबाईल नाहीत. आणि गावातील अँड्रॉइड मोबाईल असलेली मुले कॉलेज किंवा इतरत्र कामाला जातात मग शालेय मुलांना मोबाईल चा काहीच उपयोग होत नाही. ऑनलाइन शिक्षणासाठी परिस्थिती प्रतिकूल आहे. तरी सुद्धा आम्ही प्रयत्नशील आहोत. असे देखील शिक्षक राजू मोरे म्हणाले.

## महाड येथील ग्रामीण रुग्णालयातील १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्ह्यातील महाड येथील सध्या ३० बेड्स रुग्ण क्षमता असलेल्या ग्रामीण रुग्णालयातील प्रस्तावित १०० खाटांची रुग्ण क्षमता असलेल्या उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असून त्यास लवकरच शासनाची मान्यता मिळणार आहे.

जिल्ह्यात वैद्यकीय व आरोग्य विषयक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याकरिता पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी सकारात्मकरित्या केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश मिळणार आहे.

कोकण रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्ग या वाहतुकीच्या सुविधा तसेच जिल्ह्यातील वाढते औद्योगिकरण यामुळे महाड येथील ग्रामीण रुग्णालयास संलग्नतेने कार्यरत असलेले ट्रॉमा केअर युनिटसह ग्रामीण रुग्णालयाचे १०० रुग्ण क्षमता असलेल्या उपजिल्हा रुग्णालयात रूपांतर होणे गरजेचे असल्याची बाब राज्यमंत्री तथा रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री कु. तटकरे यांनी उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, आरोग्य मंत्री ना.राजेश टोपे यांच्या निदर्शनास आणून दिली होती. तसेच, महाडचे आमदार भरत गोगावले यांनी देखील पालकमंत्री तटकरे यांच्याकडे या संदर्भात मागणी केली होती. त्यानुषंगाने महाड ग्रामीण रुग्णालयाच्या १०० खाटांची रुग्णसंख्या असलेल्या उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर अंतिम टप्प्यात असून लवकरच त्यास मंजूरी मिळणार आहे.

महाड येथे १०० खाटांची रुग्णक्षमता असलेले उपजिल्हा रुग्णालय सुरु झाल्याने येथील सामान्य जनतेची मोठी सोय होणार आहे. तसेच नैसर्गिक आपत्ती, रस्ते व रेल्वे अपघात इत्यादींमुळे बाधित व अपघातग्रस्त रुग्णांवर तातडीने उपचार करणे सुकर होणार आहे. करोना संकटामुळे आरोग्य यंत्रणेवर विशेष भर देताना जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये व जिल्हा सामान्य रुग्णालय येथे अत्याधुनिक आरोग्यसुविधा, रुग्णालयांची क्षमता वाढविण्यासाठी व बळकटीकरणासाठी पालकमंत्री कु. आदिती तटकरे प्रयत्नशील असल्याचे दिसून येते.

## आर.डी.सी. बँके कळंबोली शाखेचा वर्धापन दिन साजरा बचत गटाला कर्ज वितरण व खातेदारांना मास्क वाटप

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

राज्यात सहकार क्षेत्रामध्ये अग्रगण्य व नामांकित असलेल्या रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कळंबोली शाखेचा आठवा वर्धापन दिन छोटेखानी समारंभात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वर्धापन दिनाचे औचित्य साधून शाखेच्यावतीने महिला बचत गटांना कर्ज वितरणाचे चेक व खातेदारांना मास्क चे वाटप यावेळी करण्यात आले. यावेळी उपस्थित खातेदारांनी बँकेची आर्थिक उन्नती होण्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.



रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची कळंबोली शाखा सुधागड विद्यासंकुलाच्या स्थळी आठ वर्षापूर्वी सुरू करण्यात आली होती. गेल्या आठ वर्षात बँकेच्या शाखेशी हजारो खातेदार, महिला बचत गट जोडले गेले आहेत. आज सोशल डिस्टन्सचे पालन करून कळंबोली शाखेच्या शाखाधिकारी सोनल कमाने यांनी शाखेचा वर्धापन दिन निमित्त शाखेत लोकप्रतिनिधी, खातेदार, महिला बचत गटांचे प्रमुखांना बोलून छोटेखानी कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी शाखेच्या वर्धापन दिनानिमित्त शेकाप नेते व पनवेल महापालिकेतील नगरसेवक गोपाळ भगत यांच्या हस्ते केक कापून बँकेचा वाढदिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी शेकापचे नेते महादेव बुकम शाखाधिकारी सोनल कमाने, पनवेल शाखेचे शाखाधिकारी नितीन जाधव, बँकेचे रोखपाल नितेश तोंडसे, पत्रकार सुनील कोळी, दिपक घोसाळकर व खातेदार या वेळी उपस्थित होते. वर्धापन दिनी बँके विषयी माहिती देताना नितेश तोंडसे यांनी सांगितले की सद्यस्थितीत शाखेची आर्थिक उन्नती चांगली झाली असून जवळपास १४ कोटीच्या ठेवी बँकेने जमवल्या असून ३४ कोटी पर्यंत कर्ज वितरण केले आहे. बँकेची भरभराट गेल्या आठ वर्षात समाधान कारक आहे. बँकेच्या माध्यमातून व नाबार्ड च्या सहकार्याने महिला बचत गटातील महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन पर विविध छोट्या छोट्या उद्योगांचे प्रशिक्षण देण्याची योजना बँकेने आयोजिले आहे. त्यासाठी विविध उद्योगांचे प्रशिक्षण देण्यासही कळंबोली शाखेने प्रारंभ केला आहे. या योजनेस महिला बचत गटाकडून ही चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे शाखाधिकारी सोनल कमाने यांनी यावेळी सांगितले.

## श्रीवर्धनमध्ये घरीच विलगीकरणात ठेवलेल्या कोरोना बाधित रुग्णांचा सर्वत्र मुक्त संचार, नियंत्रण कोणी ठेवायचे?

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन मध्ये कोरोना बाधित रुग्णांचा सर्वत्र मुक्त संचार सुरू असून त्यांच्यावरती नियंत्रण कोणी ठेवायचे? असा प्रश्ना ऐरणीवर आला आहे. श्रीवर्धन तालुक्यात आजमितीला १४४ कोरोना बाधित रुग्ण आपल्या घरीच विलगीकरणा मध्ये उपचार घेत आहेत. यामधील ४० ते ५० रुग्ण श्रीवर्धन शहरातील आहेत. श्रीवर्धन शहरातील काही कोरोना बाधित रुग्ण सकाळच्या वेळेस समुद्रावरती फेरफटका मारण्यासाठी देखील येत असल्याचे निदर्शनास येत आहे. विलगीकरणात ठेवलेले कोरोना बाधित रुग्ण बिनधास्तपणे फिरत असल्यामुळे श्रीवर्धन तालुक्यात कोरोना बाधितांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे पाहायला मिळत आहे. काल दिवसभरात श्रीवर्धन तालुक्यामध्ये २६ कोरोना बाधित नवीन रुग्ण आढळून आले.

आत्तापर्यंत श्रीवर्धन तालुक्यात एकूण १२९३ कोरोना बाधित रुग्ण आढळले असून १७६ रुग्ण उपचार घेत आहेत. तर ६४ जणांचा मृत्यू झाला आहे. १०५३ रुग्ण कोरोनातून मुक्त झाले आहेत. विलगीकरणात उपचार घेत असलेले रुग्ण मुक्तपणे फिरत असतील तर त्यांना आराठी येथील कोविड केअर सेंटर मध्ये नेऊन ठेवण्यात यावे अशी मागणी आता नागरिकांमधून केली जात आहे. कोरोना बाधित एक रुग्ण जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथे उपचार घेत आहे. तर २६ रुग्ण श्रीवर्धनच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये उपचार घेत असून आराठी येथील कोविड केअर सेंटर मध्ये दोन रुग्ण उपचार घेत आहेत. तर १४४ जण घरीच विलगीकरणा मध्ये राहून उपचार घेत आहेत. कोरोना बाधित असून देखील सकाळच्या वेळेस समुद्रकिनार्या वरती फिरायला येणाऱ्या रुग्णांवर प्रशासनाने करडी नजर ठेवणे आवश्यक आहे. अन्यथा रुग्ण संख्या कमी न झाल्यास श्रीवर्धन तालुका रेडझोन मध्ये जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## माथेरान शिवसेनेच्या नगरसेवकांनी घेतली मा. ना.एकनाथ शिंदेची भेट

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान शिवसेनेतुन भाजपवासी झालेल्या नगरसेवकांना रायगड जिल्हाधिकारी यांनी अपात्रतेबाबत नोटीस बजावली असून त्याची सुनावणी ३० जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग येथे होणार आहे.शिवसेनेच्या एकूण चौदा नगरसेवकांपैकी नऊ आणि एका स्वीकृत नगरसेवकाने भाजप मध्ये प्रवेश केला आहे.



> पक्षाशी गद्दारी करून भाजप मध्ये गेलेल्या नगरसेवकांना त्यांची चूक लक्षात येईल. निवडणूकीत मतदार त्यांना त्यांची जागा दाखवून देतील यात शंकाच नाही. परंतु यापुढे सर्व शिवसैनिकांनी पुन्हा एकदा जोमाने कामाला लागून माथेरान नगरपरिषदेवर भगवा फडकविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करा.
>
> **ना.एकनाथ शिंदे,**
> **महाराष्ट्र नगर विकास मंत्री**

काही महिन्यांवर नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक येऊन ठेपलेली असताना या दहा नगरसेवकांनी पक्षांतर केले आहे. त्यामुळे पक्षांतर बंदी कायद्यानुसार या सर्व दहा जणांना अपात्र ठरविण्याबाबत दि.३० जून रोजी सुनावणी जाहीर करण्यात आली आहे. आगामी निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पक्षात आजही जेष्ठ, आजी माजी पदाधिकारी यांचे संघटन मजबूत असून शिवसेनेच्या माध्यमातून होत असलेल्या विकास कामाच्या जोरावर यापुढेही शिवसेनेची सत्ता स्थापन करण्यात येईल असा विश्वास शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी आणि गटनेते प्रसाद सावंत यांनी ना.मा.एकनाथ शिंदे यांच्या कडे व्यक्त केला आहे.

आज या शिष्टमंडळाने मा.ना. एकनाथ शिंदे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी माथेरानचे नगरसेवक नरेश काळे, शकील पटेल, राजेंद्र शिंदे, नगरसेविका कीर्ती मोरे, नगरसेविका ऋजुता प्रधान, रत्नदीप प्रधान, ठाण्याचे नगरसेवक सिद्धार्थ ओवलेकर, बाळा गवस आणि अशोक शिंदे उपस्थित होते.

## श्री शिवसह्याद्री संस्था आयोजित श्री शिवराज्याभिषेक सोहळा पनवेलमध्ये उत्साहाने साजरा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री शिवसह्याद्री संस्था आयोजित श्री शिवराज्याभिषेक सोहळा पनवेलमध्ये उत्साहाने साजरा करण्यात आला. या वेळी शासनाने पारित केलेल्या कोविड नियमांचे पालन करत हा कार्यक्रम पार पडला.

अतिशय साध्या पद्धतीने कार्यक्रम असून मोजक्याच पदाधिकारी आणि सदस्यांच्या उपस्थितीने आणि महाराजांच्या जय घोषाने परिसर दणाणून गेला. अतिशय प्रेमपूर्वक या सोहळ्याची सांगता करत एकतेचा संदेश देण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सागर मुंढे, तालुका अध्यक्ष हनुमान वायभासे, संस्था सेक्रेटरी नरेंद्र चाचड, विशेष कार्यकारी अधिकारी निशांत म्हात्रे, रमेश चव्हाण, विशाल धायजे, श्री शिव सह्याद्री संस्था ढोल पथक प्रमुख समीर जाधव, निशांत मांडवकर, अभिजित कोकरे, शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान पनवेल विभागाचे अक्षय मिसाळ, संकेत भोसले, सुरज गायकवाड, राजे शिवराय प्रतिष्ठान व राजे प्रतिष्ठान चे सतीश हातमोडे व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तसेच तरुण वर्ग सहभागी झाले होते.

## मुरुड मधील सलीमा परकार गर्ल्स हायस्कूलमध्ये कोविड केअर सेंटर सुरु

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यातील कोरोना बाधितांची वाढती संख्या पाहता शहरातील अंजुमन इस्लाम जंजिराचे सलीमा परकार गर्ल्स हायस्कूल मुरुड येथे शासनातर्फे कोविड केअर सेंटर सुरु करण्यात आले आहे. मुरुड मधील बऱ्याचस्या कोरोना बाधित रुग्णांना होम क्वारंटाईन साठी घरात राहायला वेगळी खोली, वेगळे बाथरूम शौचालय नसल्यामुळे फार गैरसोय होत होती तसेच घरातील इतर व्यक्तींना कोरोनाची लागण होण्याची भीती होती. त्यामुळे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढतच होता याचे गांभीर्य ओळखून मुरुड तहसीलदार गमन गावित, मुरुड नगर पालिका प्रशासन व पंचायत समिती मुरुड यांच्या देखरेखीखाली व सहकार्याने सदरचे कोविड केअर सेंटर सुरु करण्यात आले आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शाळा बंद असल्याने सदरच्या इमारतीमध्ये कोविड केअर सेंटर सुरु करण्यासाठी शाळा व्यवस्थापनाने इमारतीमधील चार खोल्या देण्यासाठी त्वरित संमती दर्शवली. सध्या तेथे १९ कोरोनाबाधित रुग्ण उपचार घेत असून त्यांच्या जेवण खाण्याची सोय तहसील कार्यालयामार्फत केली जात असल्याचे आरोग्य अधिकारी राकेश पाटील यांनी सांगितले. सध्या कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत असून त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी ज्यांना होम क्वारंटाईन साठी गैरसोय असेल त्यांनी या कोविड केअर सेंटरमध्ये दाखल होऊन प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन मुरुडचे तहसीलदार व नगर परिषद प्रशासनाद्वारे करण्यात आले आहे.

## मुरूड-तळा-पुणे-मुरुड बस सुरू करण्याची तळा तालुका पत्रकार संघटनेची मागणी

**दै.रायगड नगरी । तळा**

कोकणातील सर्व सामान्यांची जनतेची एकमेव लालपरी अर्थात एस.टी. दळणवळणाचे एकमेव साधन असून तळा-पुणे नियमित चालणारी गाडी बंद केल्याने प्रवासी वर्गाचे मोठे हाल झाले आहेत. सदर बसला तळा इंदापूर माणगांव मधून मोठ्या प्रमाणावर प्रवासी मिळत होते.

घाट माथ्यावर जाणारे मोठा प्रवासी वर्ग असून जाण्यासाठी एकमेव गाडी असल्याने प्रवासी वर्गाला मोठा आधार होता. तसेच शाळा कॉंलेजला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना गाडीचा लाभ होत होता. कोरोना काळात लॉंकडाऊन असल्याने गाडी बंद होती. लॉंकडाऊन उठवून जनजीवन पुर्ववत होत असताना काही काळा साठी गाडी सुरु केली होती पण थोड्या फार प्रमाणात प्रवासी संख्या मंदावली आहे. हे वास्तव असू शकते परंतु भारनियमन कमी येत असल्याचे कारण पुढे करून गाडी बंद केली आहे अशी माहिती अधीकृत अधिकारी रोहा आगारातून प्राप्त झाली आहे. सद्या माणगांव आगारातून माणगांव तळा पुणा जामखेड बस चालू केली आहे. परंतु येताना माणगांव पर्यंतच आहे.तसेच बस अनियमित असते.

या भागातील प्रवाशांना लाभ मिळत नसल्याने नाराजी व्यक्त करीत आहेत. तरी मुरुड-तळा-पुणे-मुरुड आगारातून पुर्वीच्या वेळेत सुरु करावी. जेणे करून मुरुड तळा माणगांव स्वारगेट पुणे जाणाऱ्या प्रवाशांना लाभ होईल व महामंडळाला अधिक उत्पन्न वाढेल. तरी विभागीय कार्यालयाने त्वरीत लक्ष घालून मुरुड तळा पुणा मुरुड गाडी नव्याने सुरू करावी अशी मागणी तळा प्रेस क्लबने केली असून प्रवाशांकडून मागणी जोर धरू लागली आहे.